# प्रसिध्दी पत्रक

राज्य शासनाने महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम, २००६ हे दिनांक ६ डिसेंबर, २००८ पासून अंमलात आणले व त्याची अंमलबजावणी करण्यासाठी या अधिनियमांतर्गत महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना नियम, २००९ हे दिनांक २३ जून, २००९ पासून लागू केले आहेत. या कायद्याच्या माध्यमातून महानगरपालिका, नगरपालिका, एमएमआरडीए, सिडको व एम.आय.डी.सी. च्या अग्निशमन विभागामार्फत आगीस प्रतिबंध करणे व मालमत्तेचे संरक्षण व सामान्य जनांचे संरक्षण करण्याचे काम केले जाते.

२. राज्यात सध्या होत असलेल्या बांधकामात राष्ट्रीय बांधकाम सहिंता, २००५ मधील तरतूदीनुसार आग संरक्षक यंत्रणा या नियमातील तरतूदीनुसार पात्रता धारण करणा-या संस्थांना लायसन्स देवून त्यांच्या मार्फत बसविण्याची तरतूद आहे. अशी एजन्सी नेमण्याचे अधिकार संचालक, महाराष्ट्र अग्निशमन सेवा तसेच महानगरपालिका, नगरपालिका व एमएमआरडीए, सिडको, एमआयडीसी सारख्या विशेष नियोजन प्राधिकरणांच्या मुख्य अग्निशमन अधिकारी यांना आहेत. मात्र ठाणे, पुणे, पिंपरी-चिंचवड, नाशिक, नवी मुंबई व कल्याण-डोबिवली महानगरपालिकांनी फार कमी संस्थांना लायसन्स एजन्सी म्हणून नियुक्त केले. ही संख्या पुरेशी नसल्यामुळे संचालक, महाराष्ट्र अग्निशमन सेवा यांनी फायर प्राटेक्शन असोसिएशन ऑफ इंडिया यांच्या सहकार्याने राज्यातील अग्निशमन यंत्रणा बसविण्या-या संस्थांना आवाहन करुन अधिकृत लायसन्स एजन्सी म्हणून नोंदणी करुन घेण्यासाठी प्रयत्न केले. या प्रयत्नास यश मिळून ४० संस्थांना अग्निशमन व्यवस्था बसविण्याचे लायसन्स देण्यात आले. ही संख्या या वर्षाअखेर १५० पर्यंत नेण्याचे उद्दीष्ट आहे.

३. महानगरपालिका, नगरपालिका व विशेष नियोजन प्राधिकरणाच्या अग्निशमन विभागाकडे मान्यतेसाठी मान्यतेचे आराखडे सादर केले जातात त्यावेळी अशा प्रस्तावित बांधकामात केवळ लायसन्स प्राप्त एजन्सी मार्फतच अग्निशमन यंत्रणा बसविण्याची अट अनिवार्य केली असून या अटींची पूर्तता करणा-या प्रस्तावांनाच तपासणीअंती अग्निशमन विभागाचे ना हरकत प्रमाणपत्र दिले जाईल, अशी अट विहित करण्यात आली आहे. या उपक्रमाचे श्री.नितिन शहा, अध्यक्ष, फायर प्रोटेक्शन असोसिएशन ऑफ इंडिया यांनीदेखील स्वागत करुन राज्य शासनाच्या धोरणार सक्रिय पाठींबा देण्याचे मान्य करुन देशातील इतर राज्यांनीही अग्नि संरक्षणाबाबत महाराष्ट्राचे अनुकरण करावे असे प्रतिपादन केले.

४. श्री.एम.व्ही.देशमुख, संचालक, महाराष्ट्र अग्निशमन सेवा यांनी महाराष्ट्र शासन आणि अग्निशमन यंत्रणा बसविणा-या व्यावसाईक संस्थांनी एकत्रितपणे काम केल्यास अग्नि सुरक्षित महाराष्ट्र ठेवण्याचे उद्दीष्ट राज्यात साध्य करता येईल असा विश्वास व्यक्त केला.

# PRESS NOTE

The Government of Maharashtra has enacted Maharashtra Fire Prevention and Life Safety Measures Act in the year 2006. This Act has come in force in the state of Maharashtra from 6th December 2008. The Rules framed there under have come in force from 23rd June 2009. The State Government through Fire Departments of different Municipalities and Special Planning Authorities like MMRDA, CIDCO, MIDC are trying to implement this Act in the interest of preventing fire and to safeguard the life of the people.

2. As per the provisions of this Act, there is a unique concept of LICENCE AGENCY. Some Municipalities like Mumbai, Thane, Pune, Pimpri-Chinchwad, Nashik, Navi Mumbai and Kalyan Dombivali have made an attempt to register such Licence Agencies. But so far a very few Licence Agencies are registered with this Municipal Bodies. The Directorate of Maharashtra Fire Services has taken a special drive with the help of Fire Protection Association of India to educate and encourage such Licence Agencies in the State of Maharashtra for installation of quality equipments and its sustained maintenance.

3. The Directorate in co-operation with the Fire Protection Association of India have successfully shortlisted 40 Agencies out of 72 applications received so far. Both, the Directorate of Fire Services and Fire Protection Association of India intents to engage at-least 150 agencies in the year 2011.

4. These Agencies would work as an extended arm of Fire Department to design and plan the active and passive fire protection systems and get these approved from the competent Fire authorities.

5. At the time of occupancy of the buildings, the Final Approval also will be subject to the compliance of all the rules prescribed in the Provisional Fire NOC and subject to the Final Approval of the concerned Fire authority.

6. The first 40 agencies awarded these licences in a special event jointly organized by the Director of Maharashtra Fire Services and Fire Protection Association of India (FPAI) in Mumbai. Mr. Nitin Shah, President of Fire Protection Association of India said this would be a first and bold step taken in this State which would be exemplary for other State to emulate.

7. When enquired with the Director of Maharashtra Fire Services Mr.M.V.Deshmukh, he is of the opinion that Fire Services and Professional Industries can work in a cohesive manner for Fire Safe Society.